## हजारो वारकऱ्यांना दिंडीद्वारे दिले सायबर सुरक्षेचे महत्त्व

# विद्या प्रतिष्ठानची सायबर सुरक्षित दिंडी

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**बारामती :** येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात हजारो वारकऱ्यांना सायबर सुरक्षित दिंडीद्वारे सायबर जनजागृतीचे विविध माध्यमांतून महत्त्व पटवून सांगितले.




महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांमध्ये सायबर जागरूकता निर्माण करण्यासाठी सायबर दिंडी, किर्तन, पथनाट्य, घोषवाक्य, प्रत्यक्ष संवाद अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून सर्वसामान्य माणसापासून ते उच्च विद्याविभूषित व्यक्तींच्या जीवनात सायबर सुरक्षा किती महत्वाची आहे हे सोदाहरण पटवून दिले.

विद्या प्रतिष्ठान महाविद्यालय, बारामती आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षित दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात महाविद्यालयातील बहुसंख्य शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. वारकऱ्यांसोबत ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषात फेर धरत, फुगडी खेळत, टाळ मृदूंगाच्या गजरात विद्यार्थी वारीमध्ये सामील झाले होते व आपापल्या परिने वारकऱ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले. वारकऱ्यांनीही मनापासून सायबर सुरक्षिततेबद्दल महत्त्वाची माहिती जाणून घेतली आणि सायबर घोटाळ्यांपासून आम्ही निश्चित दोन हात दूर राहू अशी हमी दिली.

सदर दिंडीसाठी सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव यांचे मोलाचे सहकार्य लाभले. दिंडीसाठी क्विक हील फाउंडेशनचे क्लब मेंबर, विद्यार्थी आणि शिक्षक समन्वयक, सलमा शेख, यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद, बी.बी.ए (सी.ए.) विभाग प्रमुख महेश पवार, प्रा. गजानन जोशी, प्रा.किशोर ढाणे, गौतम कुदळे, डॉ.जगदीश सांगवीकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विशाल शिंदे, अनिल काळोखे, पूनम गुंजवटे, अक्षय भोसले, वैशाली पेंढारकर, कांचन खिरे व अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले.

#रा

9/12